# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email:- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./२१९५ /२०२२ दि. १२ /०८/२०२२

## परिपत्रक

**विषय :- दिनांक १३ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत फोटो, चित्रफिती इत्यादी प्रदर्शित करणेबाबत.**

संदर्भ :- मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र उशिनाग/आस्था/घरोघरी तिरंगा/मवि १/२०२२/ १०५२५/५०४९, दि. १०/०८/२०२२.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, **दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२२** या कालावधीत **हर घर तिरंगा** उपक्रमांतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांचे फोटो, चित्रफिती इ. प्रदर्शित करणेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने संदर्भिय पत्राचे अवलोकन करुन त्यामध्ये दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही घ्यावी व घेतलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास न चुकता सादर करावा.

संलग्न - वरीलप्रमाणे

(डॉ. अनिल हिरेखन)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
६. आस्थापना विभाग (नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(डॉ. विजय सिलारे)
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
# सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर - ४४० ००१
Web : www.dirhe.in/jdnagpur
E-Mail : jdhengp@rediffmail.com E-Mail : rjdng.dhepune@nic.in
फोन नं. ०७१२-२५६१७१३ फॅक्स न. ०७१२-२५५४२१०

क्रमांक : उशिनाग/आस्था/घरोघरी तिरंगा/मवि-१/२०२२/१०५२५/५०८८ दिनांक :१०.०८.२०२२

प्रति,
१. सर्व संचालक/प्राचार्य/वसतीगृह अधिक्षक
शासकीय संस्था/महाविद्यालये/वसतीगृहे
२. सर्व कुलसचिव,
अकृषी विद्यापीठे,नागपूर/रामटेक/गडचिरोली
३. सर्व प्राचार्य,
अशासकीय अनुदनित महाविद्यालये

**विषय- दि.१३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कलावधीत घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांचे फोटो,चित्रफिती इत्यादी प्रदर्शित करणेबाबत.**

संदर्भ-१.संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/घेरोघरी तिरंगा/मवि-१/२०२२/१०५२५ दि.०८.०८.२०२२
२. संचालनालयाचे परिपत्रक क्र.उशिसं/स्वातंत्र्या अमृत महोत्सव/मवि-१/२०२२/७७४७ दि.१९.०७.२०२२

उपरोक्त संदर्भिय पत्र सोबत जोडले आहे.

उपरोक्त संदर्भांकी विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, वरील संचालनालयाचे पत्रानुसार दि.१३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कलावधीत घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांचे फोटो,चित्रफिती इत्यादी प्रदर्शित करणेबाबत कळविले आहे. दिनांक १३ ते १५ ऑगस्ट २०२२ पर्यंत शासकीय सुटटी असल्यामुळे आपल्या अधिनस्त कर्मचारी सुटटी घेण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी फक्त वैद्यकीय कारणास्त घेतलेली सुटटी वघळता सदर कालावधीची सुटटी मान्य करण्यात येऊ नये तसेच सर्व कर्मचारी मुख्यालयात उपस्थित राहतील व आपल्या अधिनस्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा प्रत्यक्ष सहभाग कार्यक्रमात असेल असे सुनिश्चित करावे. प्राचार्य यांनी दिनांक १३ ते १५ ऑगसट २०२२ दरम्यान आपण स्वत:चा मुख्यालय स्थळीचा Geo.tag photograph upload करणे बंधनकारक करण्यात येत आहे तसेच स्वातंत्र्या अमृत महोत्सव साजरा करण्याबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत-वरीलप्रमाणे

(डॉ.संजय ठाकरे)
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर

प्रत- मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१ यांना माहितीकरीता सविनय सादर.

Notice

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

**Web :** www.dhepune .gov. in E-Mail :mavi.dhepune@nic.in

फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.

क्र.: उशिसं/घरोघरी तिरंगा/मवि-१/२०२२/ १०५२५ दिनांक: .८.२०२२

- 8 AUG 2022

**महत्वाचे**

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य, सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये - महाराष्ट्र राज्य.

**विषय: दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांचे फोटो, चित्रफिती इत्यादी प्रदर्शित करणेबाबत.**
संदर्भ: उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण-२०२२/ प्र.क्र.८२/ आस्था-२ दि. २२.७.२०२२

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित शासन परिपत्रकातील क्र. ७ अन्वये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या कार्यक्रमांबाबतचे फोटो, चित्रफिती सांस्कृतिक कार्य विभागाच्या बेबसाईटवर आपलोड करण्याची कार्यवाही राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना यांचेमार्फत सुरु आहे तसेच घरोघरी तिरंगा या कार्यक्रमाचेही फोटो, चित्रफिती इत्यादी बेबसाईटवर अपलोड करण्याबाबत राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना यांना निर्देशित करण्यात आले आहे. त्यानूसार सर्व विभागीय सहसंचालक कार्यालये/सर्व अकृषी वि द्यापीठे/अभिमत विद्यापीठे/सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये यांच्या स्तरावरुन आयोजित, "**घरोघरी तिरंगा**" या कार्यक्रमाचे फोटो, चित्रफिती इ. http://mahaamrut.org /mahaamrut75.org. या संकेतस्थळांवर तात्काळ प्रसिध्द करण्यात याव्यात.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रत माहितीस्तव-

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ३२
२. कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्रशा-२ उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १.

महाराष्ट्र शासन
# सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर - ४४० ००१
Web : www.dirhe.in/jdnagpur
E-Mail : jdhengp@rediffmail.com E-Mail : rjdng.dhepune@nic.in
फोन नं. ०७१२-२५६१७१३ फॅक्स न. ०७१२-२५५४२१०

क्रमांक : उशिनाग/स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव/सुचना/४८५३ /२०२२ दिनांक :०१.०८.२०२२

प्रति,

१. सर्व संचालक/प्राचार्य/वसतीगृह अधिक्षक
शासकीय संस्था/महाविद्यालये/वसतीगृहे

२. सर्व कुलसचिव,
अकृषी विद्यापीठे,नागपूर/रामटेक/गडचिरोली

३. सर्व प्राचार्य,
अशासकीय अनुदनित महाविद्यालये

**विषय- आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत स्वराज्य महोत्सव व हर घर तिरंगा या उपक्रमोच्या यशस्वी आयोजनाबाबत.**
संदर्भ-संचालनालयाचे परिपत्रक क्र.उशिसं/स्वातंत्र्या अमृत महोत्सव/मवि-१/२०२२/७७४७ दि.१९.०७.२०२२

उपरोक्त संदर्भिय पत्र सोबत जोडले आहे.

उपरोक्त संदर्भांकी विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, वरील संचालनालयाचे पत्रानुसार आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत स्वराज्य महोत्सव व हर घर तिरंगा या उपक्रमोच्या यशस्वी आयोजनाबाबत परिपत्रक काढण्यात आले आहे. सदर परिपत्रकानुसार दिलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावा. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत-वरीलप्रमाणे

**(डॉ.संजय ठाकरे)**
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर

प्रत- मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१ यांना माहितीकरीता सनिवय सादर.

आवक क्र. ९८९

कार्यालय, उच्च शिक्षण सहसंचालक

नागपूर विभाग, नागपूर

दिनांक २६/०६/२०२२

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi.dhepune@nic.in

फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.

क्र.: उशिसं/स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव/मवि-१/२०२२/ 00856 दिनांक: .७.२०२२

13 JUL 2022

परिपत्रक

विषय: आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत " स्वराज्य महोत्सव " व " हर घर तिरंगा " या उपक्रमांच्या यशस्वी आयोजनाबाबत.

वाचा : १. शासनपत्र क्र.: संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८२/आस्था-२ दि. २८ जून २०२२

२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण ८२२२/ प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४ दि. २० जून २०२२

३. पर्यटन व सास्कृतिक कार्य विभागाचे शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण ८२२२/ प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.-४ दि. ३० जून २०२२

४. अ.शा.प.क्र.संकीर्ण-८८२२/ प्र.क्र. १६१/ सां.का.४, दि.१३.०७.२०२२

५. शासनपत्र क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८२/ आस्था-२ दि.१४.०७.२०२२

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, दि. १२ मार्च, २०२१ ते १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत "आजादी का अमृत महोत्सव" या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाकडून कळविण्यात आले आहे. त्यानुसार राज्यात सदर कालावधीमध्ये "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" साजरा करण्याबाबत यापुर्वी वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने जनतेच्या मनात स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी जनमानसात रहावी या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** अंतर्गत **दि. ११ ऑगस्ट २०२२ ते दि. १७ ऑगस्ट २०२२** या कालावधीमध्ये देशभरात **"हर घर तिरंगा"** हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

**दिनांक ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत "स्वराज्य महोत्सव" हा उपक्रम राबविण्यात येणार असून सदर उपक्रम आयोजित करण्यासाठी पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभागाच्या दि.२०.०६.२०२२ व दि. ३०.०६.२०२२ च्या शासन निर्णयान्वये आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचा तपशील देण्यात आला आहे, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. (प्रत संलग्न)**

**"हर घर तिरंगा"** या अभियानांतर्गत नागरिकांनी राष्ट्रध्वजाची खरेदी स्वत: करून, आपल्या घरावर राष्ट्रध्वज फडकवणे यामध्ये अभिप्रेत आहे. या दोन्ही उपक्रमांमध्ये राज्यातील प्रत्येक विभागाने, कार्यालयाने व नागरिकाने यामध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे.

**"स्वराज्य महोत्सव"** व **"हर घर तिरंगा"** या उपक्रमामध्ये, महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांचा विविध कार्यक्रम/उपक्रमात सहभाग अतिशय महत्त्वाचा राहणार आहे. महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावरील निबंध स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, तसेच प्रभात फेरी

पदयात्रा, पथनाटये यामधून विद्यार्थ्यांचा मोठया प्रमाणात सहभाग घेता येऊ शकतो. याशिवाय, विद्यार्थी विरासत योजना, गावच्या इतिहासाचे लेखन आणि सांस्कृतिक कार्यक्रम यामधूनही विद्यार्थी मोठया प्रमाणात भाग घेऊ शकतात आणि स्वराज्य महोत्सवाचा व्यापक हेतू साध्य होऊ शकतो. या दोन्ही अभियानाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्यात यावे. तेव्हा **"स्वराज्य महोत्सव"** व **"हर घर तिरंगा"** या दोन्ही उपक्रमाच्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीसाठी आपल्या स्तरावर नियोजन करण्यात यावे.

उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाविद्यालयांनी विभागीय सहसंचालक कार्यालयास व विभागीय सहसंचालक कार्यालयांनी महाविद्यालयांचा एकत्रित अहवाल तसेच सहसंचालक कार्यालयाचा अहवाल या संचालनालयास सादर करावा. तसेच कुलसचिव, सर्व अकृषी विद्याप[illegible]ी विद्यापीठ आस्थापनेचा अहवाल सादर करावा.

सोबत- वरीलप्रमाणे

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रति,

१. कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्रशा-३ कार्यासन, प्रस्तुत संचालनालय.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
३. प्रा[illegible] कुलसचिव, सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये/सर्व अकृषी वि[illegible]/अभिमत विद्यापीठे,स्वयंअर्थ सहाय्यित विद्यापीठे/ समूह विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य.
४. मा. [illegible]धान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.